MHSO100022602022

## नि.दि.दा.क्र.६३५/२०२२ मधील नि.क्र.४७ खालील आदेश.

वादींनी सदरचा अर्ज मयत वादी क्र.१ सर्जेराव पंढरीनाथ दुरापे याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होऊन मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यांनी सदरच्या अर्जात कथन केले आहे की, वादी क्र.१ हा ता.२२.०१.२०२५ रोजी मयत झाला आहे. वादी क्र.१ हा मयत झाल्यानंतर इतर वादी हे कामानिमीत्त परगावी असल्यामुळे वादी क्र.१ चे वारस मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. त्यामुळे वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास ०८ महिने व १२ दिवसांचा विलंब झाला आहे. वादींकडून सदरचा विलंब जाणीवपुर्वक झालेला नाही. त्यामुळे सदरचा विलंब माफ करणे आवश्यक आहे. म्हणून त्यांनी त्यांचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

२. सदरचे अर्जास प्रतिवादींनी जबाब दिलेला आहे. त्यांनी त्यात म्हटले आहे की, वादींनी निष्काळजीपणे सदरचा अर्ज विलंबाने दिला आहे. त्यामुळे वादींचा अर्ज कायदेशीर नाही. वादींचा अर्ज मुदतीत नाही त्यामुळे तो फेटाळण्यात यावा.

३. वर नमूद केलेल्या कथनांचा विचार करुन माझे विचारार्थ खालील मुद्दे आहेत व त्या मुद्दयावर मी माझे कारणांसह निष्कर्ष नोंदवित आहे.

नि.क्र.४७ खालील आदेश.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे काय? | ... | होय. |
| २. | आदेश काय? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमीमांसा

### मुद्दा क्र.१ बाबतः–

४. मी वादींतर्फे विद्वान वकील श्री.पाटोळे व प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री.कदम यांचा युक्तिवाद ऐकला. तसेच सदरच्या प्रकरणांमधील संबंधीत दस्तऐवज पाहिले. वादी क्र.१ हा ता.२२.०१.२०२५ रोजी मयत झाल्याचे दिसून येते. त्यानंतर ता.०३.०१.२०२६ रोजी वादींनी सदरचा अर्ज दिलेला आहे. वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यास विलंब का झाला, याबाबतचे संयुक्तिक स्पष्टीकरण वादींतर्फे देण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर ''होकारार्थी'' नोंदवित आहे.

### मुद्दा क्र.२ बाबतः–

५. मी वर नमूद केल्याप्रमाणे सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.२ चे उत्तरासाठी खालील अंतिम आदेश पारीत करीत आहे.

**<u>नि.दि.दा.क्र.६३५/२०२२</u>.**

**<u>नि.क्र.४७ खालील आदेश</u>.**

## <u>आदेश</u>

सदरचा नि.क्र.४७ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

Digitally signed by GHANWAT SOPAN DASHRATH
Date: 2026.04.23 18:11:06 +0530

ता.२३.०४.२०२६.

(सोपान द.घनवट)
दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर,
माळशिरस.

**नि.क्र.४७ खालील आदेश.**

शेरा

मी शपथेवर सांगते की, या पी.डी.एफ. आदेश फाईल मधील मजकूर हा मूळ आदेशातील मजकूराशी शब्द न शब्द सारखा आहे.

लघुलेखकाचे नावःश्री. म. पां. सदाफुले.

न्यायालयाचे नावःदि. न्या. व. स्तर, माळशिरस.

आदेशाचा मजकूर सांगितल्याचा दि.२३.०४.२०२६.

आदेश टंकलिखित केलेला दि.२३.०४.२०२६.

आदेश स्वाक्षरित केल्याचा दि.२३.०४.२०२६.

आदेश अपलोड केल्याचा दि.२३.०४.२०२६.

स्वाक्षरित/–

(श्री. म. पां. सदाफुले )

लघुलेखक ग्रेड – २,

दिवाणी न्यायालय, व. स्तर, माळशिरस.